... मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

OFFICE OF THE VICE-CHANCELLOR
S.R.T.M.U., Nanded-431 606
Inward No.: 2171
Date of Received: 13/2/2026
Time:
Sign:

विभाग
2647
2912
14/02/26

# महाराष्ट्र शासन
## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
२८, क्वीन्स गार्डन, पुणे-४११००१

दूरध्वनी क्र. ०२०/२६३३३७४३
email id-tes.trti-mh@nic.in

website-
www.trti.maharashtra.gov.in

क्रमांक- संशोधन-2026 /प्र.क्र.१५ /का-४(सं)/ 636   दिनांक:20 जानेवारी, २०२६

प्रति,

मा.कुलगुरु
विदयापीठ (सर्व)

OFFICE OF THE PRO-VICE-CHANCELLOR
S.R.T.M.U., Nanded-431 606
Inward No.: 4026
Date of Received: 13/02/2026
Time:   Sign.:

(S.T.)

**विषय : पदव्युत्तर पदवी शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विदयार्थ्यांची यादी मिळणेबाबत..**

**संदर्भ :** महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र अछावृ- २०२२/ प्र.क्र.१३४/ का.१९ दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२३

महोदय,

आदिवासी क्षेत्रामधील सामाजिक व आर्थिक बदलांच्या प्रक्रियेचा व आदिवासी जमातींचा सखोल अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या हेतूने अनुसूचित जमातींच्या उमेदवारांकरिता संशोधन अधिछात्रवृत्ती योजना माहे एप्रिल २०२१ पासून या कार्यालयामार्फत राबविण्यात येत आहे. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात सदर योजनेच्या लाभासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येणार असुन त्याकरिता संदर्भांकीत जाहिरात प्रसिध्द करण्याची कार्यवाही सद्यस्थितीत चालु आहे. सदर योजनेकरिता प्रतिवर्ष १०० असा लक्षांक ठरविण्यात आलेला आहे.

संशोधन अधिछात्रवृत्ती या योजनेच्या उपरोक्त प्रमाणे दर्शविलेल्या लक्षांकाची पुर्ती करण्याकरिता आपल्या विदयापीठामध्ये **पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विदयार्थ्यांची यादी व त्यांचे संपर्क क्रमांक** याची माहिती या कार्यालयाच्या tes.trti@nic.in या ईमेल आयडी वर मिळण्यास विनंती आहे. जेणेकरुन या विदयार्थ्यांशी पी.एचडी अभ्यासक्रमाविषयी जागृती करता येईल व त्याचबरोबर प्रस्तावित असलेल्या मार्गदर्शनपर कार्यशाळा, संवादात्मक कार्यक्रम या प्रकारचे विविध उपक्रम या कार्यालयामार्फत करता येतील.

**सोबत - अधिछात्रवृत्ती योजना माहिती**

(PR)

PVC
13/2/26

**आपली विश्वासु**

(मंजिरी मनोलकर,भा.प्र.से)
**आयुक्त,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे**